# मराठवाड्यात तिसऱ्या दिवशीही दूध संकलनावर परिणाम

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** दूध दरावरून पुकारल्या गेलेल्या आंदोलनामुळे मराठवाड्यातील दूध संकलनावर तिसऱ्या दिवशीही परिणाम जाणवला. बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातील दूध संकलनातील घट कमालीची असून, काही ठिकाणी दूध मोफत वाटप करण्यासोबतच काही ठिकाणी टँकर अडवून दूध रस्त्यावर सोडून देण्याच्या घटना घडल्या.

औरंगाबाद जिल्ह्यातील दूध संकलनात आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून जवळपास पंधरा ते वीस हजार लिटरची सुरू असलेली घट कायम आहे. शिवाय, जालना जिल्ह्यातील संकलनातही पन्नास टक्के घट आहे. बीड जिल्ह्यातील बीड व आष्टी तालुक्यात चार ते पाच हजार लिटरचे झालेले संकलन वगळता दूध संकलनातील घट आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासूनच कायम आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील दूध संकलनातही मोठी घट नोंदली गेली आहे. जिल्ह्यात कार्यरत असलेल्या मोठ्या प्रमाणातील खासगी डेअऱ्यांचे दूध संकलनही जवळपास ठप्पच असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बीड व उस्मानाबाद जिल्ह्यात दूध उत्पादकांनीही मोठ्या प्रमाणात दूध संकलनाकडे पाठ फिरविल्याने दूध संकलनावर परिणाम झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दुसरीकडे शासनाच्या दूध संकलनावर फारसा काही परिणाम झाला नसल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले. शिवाय, संकलित केलेल्या दुधाची अपेक्षित पोचही अत्यंत गोपनीय पद्धतीने व पोलिस बंदोबस्तात केली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. जालना- नागपूर बायपास रोडवर दुधाचे टँकर अडविण्यात आले. त्यापैकी एका टँकरमधील दूध रस्त्यावर सांडून देण्यात आले. जालना जिल्ह्यातून जवळपास तेरा टँकर पोलिस बंदोस्तात अपेक्षित ठिकाणी रवाना करण्यात आल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. पैठण तालुक्यात रहाटगाव येथे विद्यार्थ्यांना मोफत दूध वाटून शासनाच्या धोरणाचा निषेध करण्यात आला. दरम्यान दूध उत्पादकांच्या नजरा शासनाच्या दराविषयीच्या भूमिकेकडे लागल्या आहेत.



**अकलूज, जि. सोलापूर : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.**

# मराठा क्रांती ठोक मोर्चाने परळी शहर दणाणले

**बीड :** मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने बुधवारी (ता. १८) येथे काढण्यात आलेल्या ठोक मोर्चा आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला. आरक्षण जाहीर झाल्याशिवाय उठायचे नाही, असा पवित्रा मोर्चेकऱ्यांनी घेतला आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासह समाजाच्या विविध प्रश्नांवर राज्यभर निघालेल्या मूक मोर्चानंतर तुळजापूर व बुधवारी परळीत हा ठोक मोर्चा निघाला.

सकाळी दहा वाजेच्या दरम्यान विविध भागांतून वाहनांनी मोर्चेकरी शहरात जमा झाले. सुरवातीला येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला कोपर्डी (जि. नगर) येथील पीडितेच्या वडिलांच्या हस्ते पुष्पहार घालून मोर्चाला सुरवात झाली. पुतळ्यापासून मोर्चेकरी घोषणा देत तहसील कार्यालयाजवळील मैदानावर एकत्र आले. या ठिकाणी प्रमुख भाषणांमधून समाजाच्या प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला. शासन समाजाची दिशाभूल करत असल्याचा आरोपही या वेळी करण्यात आला.

दरम्यान, दुपारी तीन वाजेपर्यंत मोर्चेकरी याच ठिकाणी होते. आरक्षण जाहीर होत नाही तोपर्यंत परळी सोडणार नाही, असा इशारा या वेळी देण्यात आला. दरम्यान, मोर्चेकऱ्यांनी आक्रमक घोषणाबाजी केली. शासनाविरोधी घोषणांनी परळी दणाणली होती.

सकाळ ॲग्रोवन
www.agrowon.com
मित्र ग्लोबल शिवाराचा..
आयोजित

सकाळ ॲग्रोवन संवाद
'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक

महाधन
नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित

**शुक्रवार, २० जुलै २०१८**

**विषय - सोयाबीन व कापूस किडरोग व्यवस्थापन**
**वक्ते - श्री. एम. जी. कल्याणकर**
(पीक संरक्षण तज्ज्ञ, केव्हीके, नांदेड)
**श्री. रमेश सानप**
(मार्केटिंग मॅनेजर, महाधन, नांदेड)
**स्थळ** - मारोती मंदिर, पांढरवाडी, ता. मुदखेड जि. नांदेड, **वेळ** - स. ९ वा.

**विषय - खरीप पीक व फळबाग व्यवस्थापन**
**वक्ते - प्रा. विजय भामरे**
(किटकशास्त्रज्ञ, कृषी महा.विद्यालय, लातूर)
**डॉ. सचिन डिग्रसे**
(प्रमुख शास्त्रज्ञ, केव्हीके, लातुर)
**श्री. अतुल टेमगिरे**
(महाधन सेल्स्, मॅनेजर, लातूर)
**स्थळ** - महादेव मंदिर, आशिव, ता. औसा, जि. लातूर, **वेळ** - स. ८.४५ वाजता.

**विषय - तुती व मोसंबी पीक व्यवस्थापन**
**वक्ते - श्री. ओमप्रकाश कोहिरे**
(प्राचार्य, कृषी महाविद्यालय खरपुडी)
**श्री. प्रमोद गिरीपुंजे**
(एरिया सेल्स मॅनेजर, महाधन)
**स्थळ** - रमेश सखाराम काळे यांचा मळा, वडिकाळ्या, ता. अंबड, जि. जालना, **वेळ** - स. ८ वा.

**विषय - कापूस एकात्मिक पीक व्यवस्थापन**
**वक्ते - श्री. कृष्णा कर्डिले**
(शास्त्रज्ञ, कृषीविद्या, केव्हीके, डिघोळ, बीड)
**श्री. एकनाथ गुरव**
(जिल्हा प्रतिनिधी स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज लि.)
**स्थळ** - हनुमान मंदिर, कळंमअंबा, ता. केज. जि. बीड **वेळ** - सकाळी ८.३० वा.

**विषय - कापूस पीक व्यवस्थापन**
**वक्ते - डॉ. किशोर झाडे**
(केव्हीके, औरंगाबाद)
**स्थळ** - हनुमान मंदिर सभागृह, मु. पो. सारोळा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद
**वेळ** - सकाळी ८.३० वा.

**विषय - हळद पीक व्यवस्थापन**
**वक्ते - प्रा. अनिल ओळंबे**
(विषय विशेषतज्ज, उद्यानविद्या, केव्हीके, तोंडापूर)
**स्थळ** - मारोती मंदिर, पार्डी, ता. औंढा (ना.), जि. हिंगोली
**वेळ** - सकाळी ८ वा.

**विषय - सोयाबीन किडरोग व्यवस्थापन**
**वक्ते - प्रा. अपेक्षा कसबे**
(शास्त्रज्ञ, कृषी विद्या, केव्हीके, तुळजापूर)
**श्री. ए. जी. देशमुख**
(तालुका कृषी अधिकारी, उस्मानाबाद)
**स्थळ** - मारुती मंदिर, येडशी, ता. जि. उस्मानाबाद, **वेळ** - स. ९ वा.

**विषय - कापूस पीक खत व्यवस्थापन**
**वक्ते - डॉ. आनंद गोरे**
(वरिष्ठ शास्त्रज्ञ, व.ना.म.वि. परभणी)
**श्री. ए. बी. सय्यद**
(वरिष्ठ व्यवस्थापक, महाधन)
**स्थळ** - गुगळेश्वर मंदिर, गुगळी धामणगाव, ता. सेलू, जि. परभणी, **वेळ** - सकाळी ८ वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# मराठवाड्यामध्ये पावसाचा जोर ओसरला

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** मराठवाड्यातील बहुतांश भागात सोमवारी, मंगळवारी सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत बऱ्यापैकी हजेरी लावणाऱ्या पावसाचा जोर बुधवारी (ता. १८) सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत ओसरल्याचे चित्र पाहायला मिळाले. संपूर्ण मराठवाड्यात बुधवारी सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत सरासरी १.६१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

मराठवाड्यात बुधवारी सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत जवळपास १०७ मंडळांत तुरळक पावसाची हजेरी लागली. यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील आठ, जालन्यातील पाच, परभणीतील दहा, हिंगोलीतील चौदा, नांदेडमधील ३१, बीडमधील चार, लातूरमधील २१ तर उस्मानाबादमधील १४ मंडळांचा समावेश होता. नांदेड व हिंगोलीतील काही मंडळांत १९ ते २२ मिलिमीटरपर्यंत पाऊस पडला आहे.

# विमा तर उतरविला; पण पावती आली कोरी

## सातबारा मिळत नसल्याने विमा भरणा नाही; नावाला ऑनलाइन मात्र सारंच ऑफलाइन

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** नावाला ऑनलाइन मात्र सारंच ऑफलाइन असलेल्या सेवेमुळे विमा उतरवण्यासाठी, तसेच सातबारा काढण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांची पंचाईत होताना दिसत आहे. जिल्ह्यातील रजापूरच्या सेतू व आपले सरकार केंद्रांवर तर विमा उतरविला; परंतु पावती कोरी आली आणि खात्यातून पैसे कपात झाले. त्यामुळे ती कोरी पावती संबंधित शेतकऱ्याला द्यावी कशी, असा प्रश्न केंद्रचालकाला पडल्याने विमा उतरविणेच बंद ठेवावे लागल्याची स्थिती आहे.

पैठण तालुक्यातील रजापूरच्या सेतू सुविधा व आपले सरकार केंद्रावर बुधवारी (ता. १८) सकाळी परिसरातील देवगाव, रजापूर, दाभरूळ, एकतूनी, थापटी तांडा, देवगाव तांडा येथील शेतकऱ्यांनी विमा उतरविण्यासह ऑनलाइन सातबारा काढण्यासाठी हजेरी लावली. परंतु सातबारा काढण्यासाठी सेतू केंद्राची साइट ठप्प, भूमी अभिलेखच्या साइटची गती प्रचंड धीमी आणि डिजिटल सातबाराची साइट अंडर मेंटनन्स यामुळे शेतकऱ्यांना सातबारा मिळाला नाही. केंद्रचालकाने रात्र जागून ज्यांचे सातबारे काढून ठेवले त्यांच्या हातीही विमा न भरता भूमी अभिलेखच्या साइटवरील सातबारावर स्वाक्षरी घेण्यासाठी तलाठ्यांचा शोध घेण्यापलीकडे हाती काही उरले नाही. शिवाय केंद्रचालक ज्ञानेश्वर कोठुळे यांनी देवगाव येथील दोन शेतकऱ्यांचा विमा १७ जुलैच्या रात्री महत्प्रयासाने रात्री उतरविला. त्या विम्याच्या रकमेपोटी त्यांच्या खात्यातील साडेचारशे व दोनशे रुपये कपात झाले. परंतु त्या विमा उतरविल्याची पावती मात्र कोरीच त्यांच्या हाती पडली. त्यानंतरही प्रयत्न केला असता असाच प्रकार झाला. त्यामुळे कोठुळे यांनी विमा भरणे बंद केले.




**औरंगाबाद : विमा उतरविल्यानंतर पैसे कपात झाले. परंतु पावतीवर नाव व किती पैसे भरले गेले, इतर कोणतीही माहिती न आल्याने केंद्रचालक श्री. कोठुळे यांची पंचाईत झाली.**

> माझ्या खात्यातून पैसे कपात झाले. मात्र पावती कोरी आल्याने संबंधित शेतकऱ्यांना ती द्यावी कशी. आपले नुकसान झाले; मात्र शेतकऱ्यांचे नुकसान व्हायला नको.
>
> **- ज्ञानेश्वर कोठुळे,** सेतू व आपले सरकार केंद्रचालक, रजापूर